

# पोलिसांना नको संसर्गाची धास्ती

## गणवेषासह अन्य वस्तूंच्या सॅनिटायजेशनसाठी नवे उपकरण

संतोष शाळिग्राम : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३ : कोरोनाचा धोका असूनही नागरिकांच्या सुरक्षेसाठी दिवसरात्र झटणाऱ्या पोलिसांमधील संसर्ग होण्याची भीती दूर करणाऱ्या उपकरणाची निर्मिती करण्यात आली आहे. याद्वारे गणवेष, मोबाइलसह अन्य वस्तू सॅनिटाइज करून पोलिसांना निर्धोकपणे घरी जाता येणार आहे.

कोरोनाविरुद्ध सुरू असलेल्या लढ्यात पोलिस सतत रस्त्यावर आहेत. अनेक पोलिसांना कोरोनाची बाधाही झाली आहे. अशा वातावरणात पोलिस आणि त्यांच्या कुटुंबीयांना पुण्यातील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कमुळे दिलासा मिळणार आहे. पोलिसांना कोणत्याही भीतीविना घरी जाता यावे, यासाठी त्यांच्या कपड्यांसह सर्व वस्तू निर्जंतूक करण्यासाठी अल्ट्रा व्हायलेट-सी हे तंत्रज्ञान वापरून उपकरण तयार करण्यात आले आहे. सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी 'सकाळ'ला सांगितले, की एखाद्या वस्तूवर विविष्ट काळ अतीनील किरणे सोडली, तर ती वस्तू निर्जंतूक होते. त्यासाठी अल्ट्रा व्हायलेटचे लँप बसवून एक बॉक्स तयार केला आहे. यात काही काळ वस्तू ठेऊन तिचे निर्जंतुकीकरण होईल.

पोलिसांनी ड्युटीवर येताना साधे कपडे घालून यावे. कार्यालयात गणवेष परिधान केल्यानंतर साधे कपडे या बॉक्समध्ये ठेवावेत. ड्युटी संपली की त्यांचा गणवेष उतरवून बॉक्समध्ये ठेवावा आणि त्यातील साधे आणि निर्जंतूक झालेले कपडे घालून निर्धास्तपणे कुटुंबात जावे. यामुळे कपडे, घड्याळ, मोबाइल, कागदपत्रे, लाठी यांतून संसर्ग होण्याची भीती नाहीशी होईल. घरी आल्यानंतर कुटुंबातील सदस्यांनाही धास्ती वाटणार नाही, असेही जगदाळे म्हणाले.

> उपकरणांचा आकार मोठा असल्याने त्याच्या वाहतुकीचा प्रश्न येतो. संस्था वा सरकारी विभाग उपकरण निर्मितीसाठी पुढे आल्यास या उपकरणाचे डिझाइन आणि अंतर्गत तंत्रज्ञानाची माहिती त्यांना मोफत उपलब्ध करून देण्यास सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क तयार आहे. यातून अधिकाधिक नागरिकांना त्याचा फायदा होईल.
> – डॉ. राजेंद्र जगदाळे, महासंचालक, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे

### कसे आहे उपकरण ?

यूव्ही-सॅन असे नाव या उपकरणाला दिलेले आहे. साठ बाय चाळीस सेंटीमीटर लांबी-रुंदी आणि उंची चाळीस सेंटीमीटर तसेच १६० बाय ९० सेंटीमीटर लांबी-रुंदी आणि ४० सेंटीमीटर उंची अशा दोन आकारात ही उपकरणे आहेत. यातील मोठ्या आकाराचे उपकरण हे पोलिस दलासाठी, तर लहान उपकरण रुग्णालये, हॉटेल, निवासी सोसायट्या, खासगी कार्यालये, कंपन्यांमध्ये मोबाइलसह विविध वस्तू निर्जंतूक करण्यासाठी वापरता येणार आहे.



सकाळ

# रत्नागिरी इनोव्हेटिव्ह जिल्हा म्हणून घोषित

## उदय सामंत; एक लाख नोकऱ्यांसह उद्योग रिसर्च सेंटर, आंतरराष्ट्रीय विद्यापीठ

**रत्नागिरी, ता. २७ : जिल्ह्यातील तरुणांना रोजगार संधी उपलब्ध करणारे प्रदूषणविरहित प्रकल्प रत्नागिरीत आणण्यात येणार आहेत. त्यातून औद्योगिक विकासाला चालना मिळेल. या उद्देशाने रत्नागिरी नवप्रवर्तन (इनोव्हेटिव्ह) जिल्हा म्हणून राज्य सरकारने घोषित केला आहे. यातून एक लाख नोकऱ्यांसह उद्योग रिसर्च सेंटर, आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन विद्यापीठ, जिल्ह्यात शाळा उभारण्यात येणार आहेत. या शाळांमध्ये मातृभाषा अत्यावश्यक असेल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, पुढील चार महिन्यांत जिल्ह्याचा औद्योगिक आराखडा तयार केला जाणार आहे. जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या जागांवर कारखाने आणले जातील. चार महिन्यांत डीपीआर बनविण्यात येणार असून, डॉ. जगदाळे यांच्याकडे ती जबाबदारी देण्यात आली आहे. महिनाभरात ते रत्नागिरीत येतील. वेगवेगळ्या १०० देशांतील जवळपास दोन हजार ५०० वैज्ञानिक या प्रकल्पाद्वारे संशोधन करू शकतील. एक लाखापेक्षा जास्त उच्च तंत्रज्ञानप्राप्त तरुणांना नोकऱ्या उपलब्ध होतील. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्ह्यात पर्यटन व्यावसायाला चालना देण्यासाठी रोजगार निर्मिती करण्याची संकल्पना घेऊन काम सुरू केले आहे. कोकणातील निसर्गरम्य वातावरण, समुद्रकिनारा, परदेशी शास्त्रज्ञ आणि तेथील तंत्र यावर आधारित कारखाने येणार आहेत. खासगी कारखानदारांना आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्रातील रत्नागिरी हा पहिला जिल्हा आहे. राज्यात येणाऱ्या अनेक कारखान्यांना मार्गदर्शन करणारे केंद्र रत्नागिरीत होईल. निसर्ग अबाधित ठेवणारे उद्योग आणण्याचे स्वप्न या निमित्ताने पूर्ण होणार असून, यात ऑटोमोबाईल सेक्टरचाही समावेश राहील. रत्नागिरी इनोव्हेशनचे स्वागत येथील तरुणांनी करावे. प्रकल्प ठरविताना स्थानिकांना विश्वासात घेतले जाईल. नैसर्गिक संपत्तीचा वापर करून रोजगार निर्मितीसाठी महाविकास आघाडी सरकारने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी पहिले पाऊल टाकले आहे.


उदय सामंत

### बीच शॅकच्या निविदा

बीच शॅक ही संकल्पना मुंबई, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील काही मोजक्याच किनाऱ्यांवर पायलट प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार आहे. प्रत्येक किनाऱ्यावर दहा शॅकसाठीची निविदा जाहीर करण्यात आली. हा प्रकल्प अस्तित्वात येणार नाही, अशी टीका केली जात होती. निविदा हे विरोधकांना उत्तर आहे, असे श्री. सामंत यांनी सांगितले.

**रत्नागिरीत जानेवारीत विमान उड्डाण**

पान २ वर »

Ratnagiri, Main
28/06/2020 Page No. 1

पुढारी

# कोकणचे ३ जिल्हे होणार विकसित

## रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग बनणार 'इंटरनॅशनल इनोव्हेटिव्ह रिजन'

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कोकणात नैसर्गिक साधनसंपत्तीबरोबर 'इनोव्हेटिव्ह' संशोधनासाठी अनुकूल वातावरण व क्षमता आहे. त्यामुळे कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे तीन जिल्हे 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून विकसित करण्याची सूचना ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी बुधवारी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य शासन कोकणच्या शाश्वत विकासासाठी बांधील असून, या सूचनेची अंमलबजावणी केली जाईल, असा विश्वास बैठकीत दिला.

कोकण विभागास (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे) आंतरराष्ट्रीय नवोन्मेश (इनोव्हेशन) विभाग म्हणून विकसित करण्यासंदर्भात मुंबईतील राज्य सह्याद्री अतिथीगृहात आज विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत पुण्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन'संदर्भात सादरीकरण केले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनीही या संकल्पनेला पाठिंबा दिला.

### 'इनोव्हेटिव्ह रिजन'

- गुणवत्तेमुळे विकासाची अमर्याद संधी
- साधनसंपत्तीच्या उपयोगाने पर्यावरणपूरक उद्योगांचा विकास
- पर्यावरण व आर्थिक क्षेत्राचा एकत्रित शाश्वत विकास
- उद्योग, विद्यापीठ व संशोधन केंद्रांच्या सहभागातून



**ज्ञानाधारित समाजाची निर्मिती**

- नागरिकांच्या जीवन पद्धतीत व आनंद निर्देशांकात वाढीचे ध्येय

बैठकीला विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, उद्योगमंत्री सुभाष देसाई, कौशल्य विकासमंत्री नवाब मलिक, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, परिवहनमंत्री अनिल परब, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, पर्यावरण राज्यमंत्री अदिती तटकरे आदींसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई विद्यापीठ, कृषी विद्यापीठ, मत्स्यविज्ञान संस्था या ठिकाणी आहेत. निसर्गाला हानी न पोहोचवता पुढील पन्नास-शंभर वर्षांचा विचार करून यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे, असे शरद पवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर सादरीकरणानंतर यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. पर्यावरणाचा ऱ्हास न करता कोकणचा विकास या माध्यमातून साधला जाणार आहे तसेच हा प्रकल्प राज्यासाठी भविष्यातील मोठी गुंतवणूक ठरेल, असा विश्वासही अजित पवार यांनी व्यक्त केला. पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे म्हणाले की, 'इनोव्हेशन' क्षेत्राचा विकास होण्यासाठी राज्याचे धोरण आवश्यक आहे.

Raigad Edition
Jan 7, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# कोकणात संशोधनाला चालना मिळावी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची सरकारला सूचना

कोकणात नैसर्गिक साधनसंपत्तीबरोबर नाविन्यपूर्ण संशोधनासाठी अनुकूल वातावरण व क्षमता आहे. त्यामुळे रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे तीन जिल्हे 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून विकसित करण्याची सूचना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी महाविकास आघाडी सरकारला केली. या सूचनेची अंमलबजावणी करण्यात येईल, असे स्पष्ट करतानाच, राज्य सरकार कोकणच्या शाश्वत विकासासाठी बांधिल असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

कोकणातील तीन जिल्हे आंतरराष्ट्रीय नाविन्यपूर्ण विभाग म्हणून विकसित करण्यासंदर्भात सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या विशेष बैठकीत पुण्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' संदर्भात सादरीकरण केले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनीही या संकल्पनेला पाठिंबा दर्शवत कोकणच्या व राज्याच्या विकासासाठी त्याची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे सांगितले.

या बैठकीस विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, उद्योगमंत्री सुभाष देसाई, कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, परिवहन मंत्री अनिल परब, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, पर्यावरण राज्यमंत्री अदिती तटकरे आदींसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्राला अनेक क्षेत्रात पुढे नेण्याचे प्रयत्न होत असताना कोकणला 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून विकसित करण्याची मोठी संधी आहे, असे शरद पवार यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. कोकणात त्यासाठी अनुकूल वातावरण असून, कोकणात बुद्धिमत्ता, सर्जनशीलता प्रचंड आहे. मुंबई विद्यापीठ, कृषी विद्यापीठ, मत्स्यविज्ञान संस्था याठिकाणी आहेत. कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून घेत तेथील निसर्गाला हानी न पोचवता या विभागाचा विकास करणे शक्य आहे. पुढील ५० ते १०० वर्षांचा विचार करून यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे, असेही शरद पवार यांनी सांगितले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोरही या संकल्पनेचे सादरीकरण करून त्यांच्या मान्यतेनंतर पुढे जावे, अशी सूचनाही शरद पवार यांनी केली.

### भविष्यातील मोठी गुंतवणूक

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कोकणातील तिन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक होत आहे. तिन्ही मंत्री आणि राज्य सरकार कोकणचा 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' विकास करण्यासाठी सकारात्मक आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर सादरीकरणानंतर यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. पर्यावरणाचा ऱ्हास न करता कोकणचा विकास या माध्यमातून साधला जाणार आहे तसेच हा प्रकल्प राज्यासाठी भविष्यातील मोठी गुंतवणूक ठरेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केला. 'इनोव्हेशन' क्षेत्राचा विकास होण्यासाठी हे बंधन आणि दबावापासून मुक्त असले पाहिजे. त्यासाठी राज्याचे धोरण आवश्यक असल्याचेही पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

---

पुढारी

आपला जिल्हा निवडा

होम / Mumbai-Thane-Raigad

## कोकणचा 'इंटरनॅशनल ग्रीनफिल्ड इनोव्हेटिव्ह रिजन' विकास करण्यासाठी सकारात्मक : उपमुख्यमंत्री अजित पवार

Last Updated: Jan 06 2021 5:37PM



---

maharashtra TODAY

मराठी बातम्या English शहरे पॉलिटिकल दंगल संपा

MUMBAI MARATHI NEWS / मराठी बातम्या

## राज्यातील 'आयटीआय'च्या अद्ययावतीकरणातून जागतिक दर्जाच्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती



सकाळ

Newsletter | आजचा ई-पेपर Friday, January 8, 2021



# इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून कोकणच्या विकासासाठी बांधील : अजित पवार

सकाळ न्यूज नेटवर्क | Wednesday, 6 January 2021

A+ A-

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, राज्य शासन कोकणच्या शाश्वत विकासासाठी बांधिल असून शरद पवार साहेबांच्या सूचनेची अंमलबजावणी केली जाईल, असा विश्वास बैठकीत दिला.



नवाकाळ

करणारी महिला, विद्यार्थ्यांचं कृत्य

आघाडीच्या बातम्या | महाराष्ट्र

## 'इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून कोकणच्या विकासासाठी बांधिल – उपमुख्यमंत्री अजित पवार

Team Navakal January 6, 2021



लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

## 'इनोव्हेटिव्ह रिजन' म्हणून कोकणच्या विकासासाठी बांधील – अजित पवार

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची सूचना....

लोकसत्ता ऑनलाइन | January 6, 2021 05:10 pm



सकाळ

# संशोधक, स्टार्ट-अपसाठी अनुदानाची संधी

**पुणे, ता. १७ :** 'सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी पार्क'च्या वतीने नवसंशोधक आणि स्टार्टअप्ससाठी अनुदान किंवा फेलोशिप उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाची (डी.एस.टी.) संस्था असलेल्या या पार्कच्या वतीने ई.आय.आर. आणि प्रयास अशा दोन योजनांच्या अंतर्गत या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत २५ मार्चपर्यंत आहे.

- **निधी :** नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर डेव्हलपिंग अँड हार्सिंग इनोव्हेशन (निधी) अंतर्गत प्रतिभावान व्यक्तींना उद्योजक बनण्यासाठी प्रेरित करणे, स्टार्ट-अप्सला आर्थिक पाठबळ देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. निवड झालेल्या उमेदवारांना १० ते ३० हजार रुपयांचे मासिक अनुदान १२ ते १८ महिन्यांसाठी दिले जाईल. अनुसूचित जाती (एससी) व जमाती (एसटी) अर्जदारांसाठी काही जागा राखीव ठेवल्या आहेत. संकेतस्थळ : https://scitechpark.org.in/nidhi-eir/

- **प्रयास :** इनोव्हेटर्स आणि स्टार्ट-अप संस्थापकांना त्यांच्या नवीन तंत्रज्ञानाच्या कल्पनेला प्रोटोटाइपमध्ये विकसित करण्यासाठी १० लाखापर्यंतचे अनुदान प्रयास (प्रमोटिंग अॅन्ड एक्सेलरेटिंग यंग अॅन्ड एस्पाईरिंग टेक्नॉलॉजी एन्त्रेप्रेनेअरर्स) कार्यक्रमाच्या अंतर्गत दिले जाते. संकेतस्थळ : https://scitechpark.org.in/scitech-park-nidhi-prayas-center/

Pune, Main
18/03/2021 Page No. 3

## News channel coverage




ABP Majha Marathi (https://www.youtube.com/watch?v=mi9tDUG7dkg)